महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे -३०

# नाविन्यपूर्ण नवोपक्रम

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी

शालेय स्तरावरील नवोपक्रम स्पर्धा.

सन २०२१-२२

**नवोपक्रम (प्राथमिक विभाग)**

# भाषिक खेळातून भाषासमृद्धी


**नवोपक्रमकर्त्याचे नाव** : श्री. विवेकानंद भानुदास ढाकणे

( प्राथमिक शिक्षक बी.ए.डी.एड.)

**शाळा** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आवलगाव, केंद्र खडका,

तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी.

# ✵ ऋणनिर्देश ✵

जीवनामध्ये आनंद घेण्यासाठी कौशल्य व त्यास सृजनशीलतेची जोड  असणे गरजेचे आहे. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत वाढ होऊन भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा हे उद्दिष्ट ठेवून प्रस्तुत नवोपक्रम पूर्ण केला.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी नवोपक्रम सादर करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली.

आमचे आवडते गटशिक्षण अधिकारी मा.श्री.शौकत पठाण साहेब यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले. विशेष सहकार्य श्रीमती प्रतिभा लोखंडे (महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ सदस्या, विषय मराठी) तसेच आमचे केंद्रप्रमुख श्री.कवडे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच माझे  सहकारी शिक्षक  श्री. हेडे सर श्री.भंडारे सर, श्री. डाके सर,श्री.जाधव सर,सूर्यवंशी सर व शाळेचे मुख्याध्यापक नाईकवाडे सर,साधनव्यक्ती श्री.गोदाम सर  यांनी नवोपक्रमास सहकार्य केले.

या नवोपक्रमासाठी सर्वांचे सहकार्य ,मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. या सर्वांचा मी ऋणी आहे. तसेच प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष ज्यांचे या नवोपक्रमास सहकार्य लाभले त्या सर्वांचा मी आभारी आहे.

**नवोपक्रमकर्ता**

श्री. विवेकानंद भानुदास ढाकणे

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आवलगाव

तालुका सोनपेठ जिल्हा परभणी

मो.नं.  ९९२३२२७५०३

## ❁ अनुक्रमणिका ❁


| अ.क्र. | घटक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक,<br>नवोपक्रमाची गरज व महत्व | ०४ |
| २ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ०६ |
| ३ | नवोपक्रमाचे नियोजन | ०६ |
| ४ | नवोपक्रमाची कार्यवाही | १२ |
| ५ | नवोपक्रमाची यशस्विता | ३९ |
| ६ | समारोप | ४० |
| ७ | परिशिष्टे | ४२ |
| ८ | संदर्भसूची | ४१ |

**नवोपक्रमाचे शीर्षक** : भाषिक खेळातून भाषासमृद्धी

**१.नवोपक्रमाची गरज व महत्व :** आपल्या वर्गातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उत्तम रितीने बोलता यावे हे प्रत्येक भाषा शिक्षकाचे स्वप्न असते. माझ्या वर्गातील विद्यार्थी क्षमता असूनही पुढे येऊन बोलण्यास भितात याचे कारण त्यांच्या जवळील शब्दसंग्रहाची कमतरता. शब्दसंपत्ती कमतरतेची अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक मुख्य कारण म्हणजे विद्यार्थ्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती, कामानिमित्त वारंवार पालकांसोबत स्थलांतर तसेच कोरोनामुळे शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये निर्माण झालेली प्रत्यक्ष अध्ययन- अध्यापनातील दरी. माझ्या वर्गात येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक हे आर्थिक दृष्ट्या कमकुवत असून वर्तमानपत्र, टीव्ही, संगणक इत्यादी संप्रेषणाची साधने आपल्या पाल्यांना ते उपलब्ध करून देऊ शकत नव्हते. पालक स्वतः अल्पशिक्षित असल्यामुळे विद्यार्थ्यांशी प्रमाण भाषेत संवाद साधू शकत नव्हते. श्रवण, भाषण, वाचन, लेखन या क्षमता विकसना बरोबरच विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह विकसित करणे हे देखील भाषा शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. पण त्याकडे पाहिजे त्या प्रमाणात लक्ष दिले गेले नाही हे माझ्या लक्षात आले. परिणामता: विद्यार्थ्यांजवळ शब्द साठा फारच कमी असल्याचे दिसून आले. वर्गात चर्चा करताना, परिपाठ सादर करताना वर्गातील आठ-दहा मुले पुढे येत होती. बाकी विद्यार्थी प्रतिसाद देत नव्हते. चित्रवर्णन, निबंधलेखन करू शकत नव्हते. त्यांना आत्मविश्वासपूर्वक बोलता येत नव्हते. भाषिक खेळ याद्वारे आपण विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत फार झपाट्याने वाढ करू शकतो हे माझ्या लक्षात आले कारण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनापेक्षा खेळ हा प्रकार फार प्रिय आहे. त्यामुळे मी ऑफलाईन अभ्यासगटातून तसेच ऑनलाईन पद्धतीने अनेक भाषिक खेळांची निर्मिती केली.

विविध उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी केल्यास निश्चितच विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढेल असे मला वाटले. विद्यार्थी प्रमाण भाषेचा उपयोग करून स्वतः जवळीची माहिती वर्गात सांगू शकतील, अध्ययन-अध्यापन आंतरक्रियेत आनंदाने सहभागी होतील. निबंधलेखन, चित्रवर्णन करतील. संवाद, नाटक, भाषण, मुलाखत इत्यादी उपक्रमांमध्ये सहभागी होतील. त्यांना स्व ची जाणीव होईल. परिणामकारक संप्रेषण करू शकतील असे मला वाटले.

भाषा हे संपूर्ण मानव जातीला मिळालेले सर्वश्रेष्ठ असे वरदान आहे. मुलांच्या आत्मविश्वासाचा प्रारंभ मातृभाषेपासूनच होतो. कुटुंब, परिसर आणि समाजाशी संबंध प्रस्थापित करण्याची कौशल्ये मातृभाषा अर्थात मराठी मुळेच बालकात निर्माण होते. बालक विचार करते ते मातृभाषेच्या आधारे. त्याच्या बुद्धीचा आणि आकलन क्षमतेचा विकास मातृभाषेच्या सहकार्याने होतो. बालकाचे भावात्मक आणि सांस्कृतिक जीवनही मातृभाषा मराठी समृद्ध करते. रसिकता, अभिरुची यांचाही विकास होतो. शिक्षण तज्ञ डॉ. झाकीर हुसेन यांनी म्हटल्याप्रमाणे, “सौंदर्यविषयक दृष्टी व रसास्वादाच्या अभिव्यक्तीचा नैसर्गिक झरा म्हणजे मातृभाषा मराठी होय. ”

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ ची रचना राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ ,बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ व राज्य अभ्यासक्रम

आराखडा २०१० यातील मार्गदर्शक तत्वांनुसार करण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ मध्ये ज्ञानरचनावादी विचारसरणी स्वीकारण्यात आली आहे. इतरांच्या शिकविण्यापेक्षा मुलांच्या स्वतःच्या शिकण्यातून विकास अधिक होत असतो. विद्यार्थी स्वतः ज्ञान निर्मिती करत असतात असे जीन पियाजे, वायगॉटस्की यांनी दाखवून दिले आहे. ही ज्ञाननिर्मिती प्रक्रिया सुलभ करणे शिक्षकांचे कर्तव्य आहे. आंतरक्रिया घडून येण्यासाठी शब्द हे महत्त्वाचे साधन आहे. 'शब्देविण संवादु' असे म्हटले असले तरी त्याची वारंवारिता फारच कमी आहे. प्रभावी आंतरक्रियेसाठी शब्द हेच साधन महत्त्वाचे ठरते. यासाठी मुलांच्या शब्दसंपत्तीत जास्तीत जास्त भर कशी पडेल याचा विचार करावा लागेल.

शब्द हे संवादाचे साधन नाही अशी व्याख्या करणे आपल्यापैकी बहुतेकांच्या इतके अंगवळणी पडले आहे की विचार करणे, संवेदना किंवा जाणीव होणे आणि प्रतिसाद देणे या सर्वांचे साधन म्हणूनही शब्द फार उपयोगी आहे, हे आपण अनेकदा विसरतो. लहान मुला बरोबर काम करण्याच्या दृष्टीने शब्दांचा व्यापक उपयोग फारच महत्त्वाचा आहे. कारण मुलांचे व्यक्तिमत्त्व आणि क्षमता त्यांच्या विकासाला बाल्यावस्थेत शब्दामुळे आकार घेत असते. मुलांची जगाकडे बघण्याची दृष्टी, क्षमता, मूल्य आणि वृत्ती अशा अनेक गोष्टींना शब्द सूक्ष्मपणे तरीही प्रचंड आकार देत असतात . परिसर, मित्र ,शाळा, समाज या साऱ्या बरोबर होणाऱ्या भाषिक आंतरक्रियामधून मुलांच्या श्रवण शब्दसंपत्तीत भर पडत असते.नवनवीन शब्दांचे उच्चार समजणे, पूर्वानुभवाशी ते पडताळून पाहणे, परिचित असल्यास तो स्वीकारणे अथवा अपरिचित असल्यास त्याची नवीन रचना करणे, संदर्भाने शब्दाचा अर्थ लावणे या व अशासारख्या अनेक प्रक्रिया घडत असतात. त्यामुळे ऐकलेले नवीन शब्द वापरून पाहण्याची इच्छा बालकाच्या मनामध्ये निर्माण होते.मात्र मुलाची बोली भाषा ही प्रमाण भाषेपेक्षा वेगळी असल्यामुळे यात अडथळे येतात. ते अडथळे दूर करण्यासाठी मुलांना प्रमाण भाषेतील जास्तीत जास्त आणि विविधतापूर्ण श्रवनानुभव देऊन शब्दसंपत्ती विकसित करणे गरजेचे आहे .

आपण अनुभवलेल्या बाबी बद्दल इतरांना सांगणे ही एक नैसर्गिक उर्मी आहे. आपण घेतलेला अनुभव इतरासमोर प्रभावीपणे मांडण्यासाठी मुलाजवळ भरपूर शब्द साठा असणे आवश्यक आहे. हा शब्द साठा वाढविण्यासाठी मुलांच्या श्रवण व वाचन संपत्तीत भर टाकावी लागेल.

बालकाजवळ शब्द साठा अपुरा असेल तर त्याचा भाषिक विकास होणार नाही. पर्यायाने सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास होणार नाही. कोणत्याही भाषेत प्रभुत्व संपादन करायचे असेल तर शब्दसंपत्ती हा त्याचा मूलाधार आहे. संवाद साधणे, प्रश्न विचारणे अनुभव व भावना कथन करणे ,चर्चेत सहभागी होणे, आत्मविश्वासपुर्वक बोलता येणे, निबंध लेखन करणे इत्यादी क्षमतांचा बालकांमध्ये विकास करण्यासाठी बालकांचा शब्दसंग्रह वाढविणे गरजेचे आहे.

**२.नवोपक्रमाची उद्दिष्टे :**

१)भाषिक खेळाच्या माध्यमातून विदयार्थ्यांच्या शब्दसंपत्तीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२) शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी विविध भाषिक खेळांचे विकसन करणे.

३) विदयार्थ्यांसाठी राबविलेल्या विविध उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे .

**३.नवोपक्रमाचे नियोजन :**

३.१उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षण :

माझ्या वर्गातील (इयत्ता चौथी) २१ विदयार्थ्यापैकी फक्त आठ-दहा विदयार्थी दैनंदिन अध्यापनाच्या वेळी, अभ्यासगटातील चर्चेवेळी, परिपाठ, वक्तृत्व स्पर्धा व शाळा भेटीस आलेल्या नवीन व्यक्तीसोबत प्रश्नोत्तर किंवा चर्चेत मुले सहभागी होत होती.

३.२ संबंधित व्यक्तीशी, तज्ज्ञांशी चर्चा :

श्रीमती प्रतिभा लोखंडे (महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ सदस्या, विषय मराठी) यांच्यासोबत मुलांच्या भाषिक सद्यस्थितीबाबत चर्चा केली असता असे निदर्शनास आले की विद्यार्थ्यांच्या जवळ पाहिजे त्या प्रमाणात शब्दसाठा नाही. त्यामुळे त्यांना अभिव्यक्त होताना अडचण निर्माण होत आहे. माझी ही समस्या आमच्या तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. पठाण साहेब यांच्या समोर मांडली असता त्यांनीही आपण विविध उपक्रमाच्या माध्यमातून झपाट्याने विद्यार्थ्यांच्या शब्द संपत्ती मध्ये वाढ करू शकतो असे सुचविले. तसेच केंद्रप्रमुख श्री कवडे सर यांनी देखील काही प्रमाणात भाषिक खेळ व उपक्रम सुचवले. विद्यार्थ्यांचा शब्दसाठा वाढवण्यासाठी मी स्वतः १५ नाविन्यपूर्ण उपक्रमाची निर्मिती केली.

**३.३आवश्यक साधनांची निर्मिती व वापर :** -तज्ज्ञांशी चर्चा करून हा नवोपक्रम सुरू करण्यापूर्वीची विद्यार्थ्यांजवळील शब्दसाठा जाणून घेण्यासाठी ३० गुणांची पूर्वचाचणी प्रश्नावली तयार करण्यात आली. १० उपक्रम राबविल्यानंतर विद्यार्थ्यांना आवर्तनाची गरज आहे किंवा नाही, हे तपासून पाहण्यासाठी पदनिश्चयन श्रेणीची निर्मिती केली. नवोपक्रम किती प्रमाणात यशस्वी झाला आहे, हे पडताळून पाहण्यासाठी अंतिम चाचणी प्रश्नावली तयार केली. पूर्व चाचणी प्रश्नावली, पदनिश्चयन श्रेणी, अंतिम चाचणी तयार झाल्यानंतर तज्ज्ञांद्वारे तपासून घेण्यात आली. विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढविण्यासाठी विविध साधनांचा उपयोग करून नियोजन करण्यात आले त्यासाठी पुढील गोष्टींचा आधार घेण्यात आला.

१)स्वयंअध्ययनसाठी ८४ स्वयंअध्ययन उतारे कार्ड

२)भाषिक खेळ यासाठी स्वयंअध्ययन शब्दपट्ट्या एकूण संख्या ३०

३) शब्दकोडे कार्ड, शब्दकोड्याचे पेपर कात्रणे.

४)गुगल मीटच्या साह्याने ऑनलाइन अध्यापन करणे.

५)समानार्थी शब्द कार्डचा वापर

६) ऑनलाइन चाचण्यांचे नियोजन व ऑनलाइन खेळ यासाठी wordwall.net चा वापर
७)म्हणी स्वयंअध्ययन कार्ड ८) वाक्प्रचार स्वयंअध्ययन कार्ड.

**३.४.कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)**


| अ.क्र. | कालावधी | करावयाची कृती |
|---|---|---|
| १ | दि. ६ जुलै<br>ते दि. २३ जुलै | नवोपक्रम नियोजन, तज्ज्ञांशी चर्चा, आवश्यक साधनांची निर्मिती |
| २ | दि. २४ जुलै | पूर्व चाचणी (विद्यार्थी प्रतिसाद ) |
| ३ | दि. २५ जुलै<br>ते दि.२५ सप्टेंबर | प्रत्यक्ष उपक्रम अंमलबजावणी ( 10 उपक्रम ) |
| ४ | दि. २९ सप्टेंबर | पदनिश्चयन श्रेणीद्वारे विद्यार्थी प्रतिसाद तपासणे |
| ५ | दि. १ ऑक्टोबर<br>ते दि. २४ ऑक्टोबर | आवर्तन १( ५ उपक्रमांची अंमलबजावणी ) |
| ६ | दि. २५ ऑक्टोबर | अंतिम चाचणी ( विद्यार्थी प्रतिसाद ) |
| ७ | दि. १ नोव्हेंबर<br>ते दि. ७ नोव्हेंबर | नवोपक्रम अहवाल लेखन |

मातृभाषा मराठीतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांची शब्द्संपती वाढवण्यासाठी विकसित केलेल्या  नाविन्यपूर्ण उपक्रमाची यादी.

| अ.क्र. | | उपक्रम | वापरण्याचे साहित्य | कृती | निकष |
|---|---|---|---|---|---|
| १) | | लपलेल्यांना शोधा | शब्दपट्ट्या | गाळलेली अक्षरे शोधणे | • शब्दसंपत्ती वाढवणे |
| २) | | चोरशिपाई | शब्दपट्ट्या | पळालेली अक्षरे शोधणे | • शब्दसंपत्ती वाढवणे |
| ३) | | मोगऱ्याच्या माळेत गुलाबाची फुलं | लिखित उतारे | उताऱ्याच्या आशयानुसार शब्द निवडून रिकाम्या जागेत भरणे | • आशयानुसार शब्द निवडता येणे.<br>• शब्दसंपत्ती वाढवणे |
| ४) | | शब्देश्वर कोण? | अक्षर कार्ड | शब्द तयार करणे | • शब्दसंपत्ती वाढवणे |
| ५) | | शब्दांचे मत्स्यालय | चार वेगवेगळ्या माशांची चित्रे | शब्दाच्या जातीनुसार पाठातील शब्दांचे वर्गीकरण करण्यास सांगणे . | • शब्दसंपत्ती वाढवणे.<br>• शब्दांचे वर्गीकरण करता येणे . |
| ६) | | बियातून अंकुरलेले झाड | शब्दपट्ट्या | शब्दातील प्रत्येक अक्षराला अंकुर समजून एक अक्षर घेऊन त्यापासून शब्द तयार करणे. | • शब्दकोश निर्माण करणे.<br>• शब्दसंपत्ती वाढवणे. |
| ७) | | मडक्यातील  धन शोधा. | समानार्थी शब्दाच्या शब्दपट्ट्या | समानार्थी शब्द शोधून जोड्या लावणे. | • शब्दकोश निर्माण करणे.<br>• शब्दसंपत्ती वाढवणे. |
| ८) | | विखुरलेल्या मण्याची माळ | म्हणीच्या चौकटी | चौकटीतील अक्षरापासून अर्थपूर्ण म्हण तयार करण्यास सांगणे. | • अर्थपूर्ण म्हण तयार करण्याचा सराव घेणे. |
| ९) | | अचूक प्रतिमा शोधा. | वाक्प्रचार | वाक्ये | • शब्दसंपत्ती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वापरून तयार केलेली वाक्ये | काळजीपूर्वक वाचून वाक्प्रचाराची अचूक प्रतिमा ओळखण्यास सांगणे. | वाढवणे.<br>• वाक्प्रचार शब्दसंग्रह |
| १०) | | अक्षर पाकळ्या आणि शब्दफुले | अक्षरकार्ड | दिलेल्या अक्षरापासून दिलेल्या अर्थाकरिता शब्द तयार करणे . | • समानार्थी शब्दांचा संग्रह . |
| ११) | | पळालेला पकडा | शब्दपट्ट्या | पळालेले अक्षर शोधणे | • शब्दसंपत्ती वाढवणे. |
| १२) | | शब्दकोडे | शब्दकोडे चौकटी | दिलेल्या माहितीवरून चौकटीतील रिकाम्या जागा भरणे. | • शब्दसंपत्ती वाढवणे.<br>• म्हणीचा संग्रह<br>• माहितीवरून योग्य शब्द सांगता येणे. |
| १३) | | शब्दांशी दोन हात करा. | अक्षरकार्ड | विस्कळीत अक्षरे आशयानुसार क्रमबद्ध लावून शब्द तयार करणे. | • शब्द तयार करता येणे<br>• शब्दसंपत्ती वाढवणे |
| १४) | | पाहुणा कोण ? | समानार्थी शब्दांचा संग्रह | समानार्थी शब्दांचे अर्थ शोधणे. | • समानार्थी शब्दांचा संग्रह<br>• शब्दसंपत्ती वाढवणे |
| १५) | | चित्रात दडलेले वाक्प्रचार | वाक्प्रचाराशी संबधित चित्रे | चित्रावरून वाक्प्रचार ओळखणे | • वाक्प्रचार संग्रह |

**३.६करावयाच्या कृतीचा क्रम :**



**३.७माहिती संकलनाची साधने**

| साधन | व्यक्ती | हेतू |
|---|---|---|
| चर्चा | विद्यार्थी  पालक | शब्दसंपत्ती जाणून घेण्यासाठी. |
| निरीक्षण | विद्यार्थी | भाषिक वर्तन समजावून घेण्यासाठी. |
| पूर्व चाचणी | विद्यार्थी | विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीच्या सद्यस्थितीचा शोध घेण्यासाठी. |
| पदनिश्चयन श्रेणी | विद्यार्थी | नवोपक्रमाची परिणामकारकता तपासून पाहण्यासाठी आवर्तन घेण्याची गरज आहे किंवा नाही हे निश्चित करण्यासाठी. |
| उत्तर चाचणी | विद्यार्थी | विद्यार्थ्यामधील प्रगती ( शब्दसंपत्ती वाढ ) जाणून घेण्यासाठी |
| शेकडेवारी | विद्यार्थी | यशस्विता तपासण्यासाठी |

## ४. कार्यवाही

माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांजवळ शब्दसंपत्ती किती प्रमाणात आहे, हे तपासण्यासाठी पूर्वचाचणी घेतली.

तीन अक्षरी अर्थपूर्ण शब्द तयार करणे, शब्दाच्या सुरुवातीलाच किंवा शेवटी अक्षर जोडून नवीन शब्द तयार करणे, दिलेल्या उताऱ्याच्या आशयानुसार शब्द निवडून रिकाम्या जागा भरणे, चार अक्षरी शब्द तयार करणे, दिलेल्या वाक्यातील नाम, सर्वनाम, विशेषण ओळखणे,.अकारविल्हे शब्दांचा क्रम लावता येणे, दिलेल्या शब्दांचे समानार्थी अर्थ लिहिता येणे, दिलेल्या अक्षरातून अर्थपूर्ण म्हण तयार करता येणे, वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करता येणे, इत्यादी स्वरूपाच्या प्रश्नांचा समावेश पूर्व चाचणीमध्ये करण्यात आला.( पूर्व चाचणी प्रश्नावली नमुना क्रमांक एक परिशिष्टात जोडलेली आहे)

तीस मिनिटे वेळ देऊन विद्यार्थ्यांची तीस गुणांची पूर्वचाचणी घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या प्रश्नांचे मूल्यमापन करून खालील तक्ता व आलेख तयार केला आहे.

### ४.१ माहितीचे संकलन

**पूर्व चाचणीतील विद्यार्थ्यांचा गुण दर्शवणारा तक्ता.**

| रोल नं. | प्रश्न क्र. | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गुण | २ | २ | ६ | २ | ४ | ३ | ३ | २ | ३ | ३ | ३० | |
| १ | | २ | २ | ३ | २ | २ | २ | २ | १ | १ | ३ | २० | |
| २ | | २ | १ | ० | १ | ० | २ | १ | ० | ० | १ | ०८ | |
| ३ | | २ | १ | ० | २ | ० | ३ | १ | ० | ० | १ | १० | |
| ४ | | १ | १ | ३ | १ | २ | २ | १ | १ | १ | २ | १५ | |
| ५ | | १ | ० | ३ | १ | २ | २ | १ | १ | १ | २ | १४ | |
| ६ | | ० | २ | १ | १ | ० | १ | १ | ० | १ | १ | ०८ | |
| ७ | | १ | ० | १ | १ | १ | ० | १ | १ | १ | २ | ११ | |
| ८ | | १ | २ | ३ | १ | २ | २ | ३ | १ | २ | ३ | २० | |
| ९ | | २ | १ | ३ | २ | २ | २ | २ | २ | २ | ० | १८ | |
| १० | | २ | २ | ३ | २ | २ | २ | २ | १ | १ | २ | १९ | |
| ११ | | २ | १ | ३ | १ | १ | २ | २ | ० | २ | ३ | १७ | |
| १२ | | ० | १ | १ | १ | १ | २ | १ | ० | २ | १ | १० | |
| १३ | | १ | २ | ० | १ | १ | २ | २ | १ | १ | १ | १२ | |
| १४ | | १ | ० | २ | १ | १ | १ | १ | १ | २ | १ | ११ | |
| १५ | | १ | ० | २ | १ | १ | १ | १ | १ | २ | १ | ११ | |
| १६ | | १ | २ | ० | १ | १ | २ | २ | १ | १ | १ | १२ | |
| १७ | | २ | १ | ३ | १ | १ | २ | २ | ० | २ | ३ | १७ | |
| १८ | | ० | १ | १ | १ | १ | २ | १ | ० | २ | १ | १० | |
| १९ | | २ | २ | ३ | २ | २ | २ | २ | १ | १ | २ | १९ | |
| २० | | २ | १ | ३ | २ | २ | २ | २ | २ | २ | ० | १८ | |
| २१ | | १ | २ | ३ | १ | २ | २ | ३ | १ | २ | ३ | २० | |

**उपक्रम क्रमांक -१**

**उद्देश -शब्दसंपत्ती वाढविणे** कृती- सर्वप्रथम खेळ खेळताना विद्यार्थ्यांना तो खेळ कसा खेळायचा याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना शब्दपट्ट्या वितरित केल्या. तुम्हाला दिलेल्या शब्दपट्ट्यांमधून काही अक्षरे पळून जाऊन लपलेले आहेत ते शोधून काढा अशी सूचना दिली . प्रत्येक गटातील किती अक्षरे पळाली आहेत ती व त्याची जागा सांगितलेली आहे. पाहुया कोण लवकरात लवकर सगळे अक्षरे शोधून काढतो ते.
खेळाचे नाव

**खेळ क्रमांक - १ लपलेल्यांना शोधा.**

पहिले अक्षर शोधा. खालील गटातील सर्व शब्दांचे पहिले अक्षर समान आहे.

देश, हार, देह, सार
उत्तर -संदेश, संहार, संदेह संसार

गट १- दार, संत, कड, घड,कळ
गट २- लय, ताप, मुख, हार वास

**खेळ क्रमांक - २**

पहिली दोन अक्षरे शोधा. प्रत्येक गटातील सर्व शब्दांची पहिली दोन अक्षरे समान आहेत.
गट १- साद, वादी, पक्ष, स्पर्धी, ध्वनी

गट २- तंत्र, गणना, सेवा, संख्या, सेवक

गट ३- सत्ता, पाट, कारण, महाल, कन्या

**खेळ क्रमांक - ३**

मधले अक्षर शोधा. प्रत्येक शब्दाचे मधले अक्षर समान आहे.

गट १- पत, कर, निळा, निशा, आस

गट २- शर, बर, कर, सन, गन

गट ३- नर, सार, घार, भर, डर

**खेळ क्रमांक  - ४**

मधली दोन अक्षरे शोधा. प्रत्येक गटातील सर्व शब्दांची मधली अक्षरे समान आहेत.

गट १- आण, साण, पाणी, आडा, उणे

गट २- गोळा, उळा, हिह, भुळा, गुंळ

गट ३- पड, साण, खड,खाण, तड

**खेळ क्रमांक - ५**

शेवटचे अक्षर शोधा. प्रत्येक गटातील सर्व शब्दांचे शेवटचे अक्षर समान आहे.

गट 1- नर, गर, शर, पर, चर

गट 2- भड, सण, गण, कड, तड

गट 3- चाट, वाट, लाट,
बट, उट

**खेळ क्रमांक - ६**

शेवटची दोन अक्षरे शोधा. प्रत्येक गटातील सर्व शब्दांची शेवटची दोन अक्षरे समान आहेत.

गट 1- प, सं, क, ब, बि

गट 2- कळ, मळ, तळ, जळ,बळ

गट 3- राज, वान, मळ, कड, कर

**खेळ क्रमांक - ७**

शेवटची तीन अक्षरे शोधा. प्रत्येक गटातील सर्व शब्दांची शेवटची तीन अक्षरे समान आहेत.

गट 1- उप,हानी, विस्मय, अपाय, गुण

गट 2- झ, च, प, म, त

गट 3- झो, बा, चट, टो, चम

**खेळ क्रमांक - ८**

पहिले व शेवटचे अक्षर ओळखा. प्रत्येक गटातील पहिले व शेवटचे अक्षर एकच आहे.

गट 1- च, म, झ, ख

गट 2 - त, ठ, ल, च, क्षि

गट 3- पचा, जाग, बदा, पका, सनवा

**उपक्रम २ - चोर शिपाई**

**कृती** -सर्वप्रथम खेळ खेळताना विद्यार्थ्यांना तो खेळ कसा खेळायचा याविषयी मार्गदर्शन केले. हा खेळ एकाच वेळी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे खेळायचा आहे असे सांगितले . विद्यार्थ्यांना खेळाच्या शब्द पट्ट्या दिल्या.

वेळ- तीस मिनिटे

तुम्हाला खेळ क्रमांक १ ते खेळ क्र. ५ मध्ये प्रत्येकी पंधरा शब्द दिलेले आहेत. त्या सर्व शब्दांमधून एक अक्षर पळून गेलेले आहे. त्या चोराला पकडून आणून योग्य त्या जागी बसवले तर ७५ नवीन शब्द तयार होतील. पहिल्या गटात ते अक्षर पहिले आहे. दुसऱ्या गटात मधले आहे व तिसऱ्या गटात ते शेवटचे आहे. बघूया कोण चोराला पटकन शोधतो ते!

**खेळ क्र. १**

पहिला गट - चरा, जाग, डबा, डक, मर

दुसरा गट- उड, माड, वाडा, चार

तिसरा गट - घट, कड, भन, सण

**खेळ क्र. २**

पहिला गट - न , क्ता, जन, रात, कील

दुसरा गट - कन, भन, जेन, पन, नरा

तिसरा गट- पडा, झडा, पुसा, रुसा, बसा

**खेळ क्र. ३**

पहिला गट - ज, रूड , जरा

दुसरा गट - का द, बो दा, ज णे

तिसरा गट- रा, आ, भा

**खेळ क्र. ४**

पहिला गट - कळी, गोटे, टली

दुसरा गट - र टा, अ त्र, स ट

तिसरा गट- वच , खो , उत्त

**खेळ क्र. ५**

पहिला गट - हर, लित, सूण

दुसरा गट - ज द, क म, दा न

तिसरा गट- भूज , तेज , मांस

**उपक्रम क्रमांक -३ मोगऱ्याच्या माळेत गुलाबाची फुलं**

उद्देश- दिलेल्या उताऱ्याच्या आशयानुसार शब्द निवडून रिकाम्या जागा भरणे, शब्दसंपत्ती वाढविणे.

**उदा: उतारा क्रमांक १**

**(वकील, सखाराम, पालकांनी, लेक, इन्स्पेक्टर, जिल्हाधिकारी, विद्यार्थी )**

अहो ------- तुम्हाला माहित आहे का ? आपल्या जिल्ह्याची ------- कोण आहे ? एक महिलाच आहे . तालुक्याच्या पोलीस स्टेशनलाही ------ म्हणून महिलाच आहे. शेजारच्या गल्लीतल्या त्या दामुअण्णा ची -------- डॉक्टर झाली गेल्यावर्षी. माहितीय ना तुम्हाला! अजून किती उदाहरणं द्यायची! आता कित्येक डॉक्टर, ------ ,इंजिनीयर या महिला आहेत. त्या साऱ्यांच्या ------ तुमच्यासारख्याच विचार केला असता तर?

**उतारा क्रमांक- २**

**(भरण्याची, बाबासाहेब आंबेडकर, पाणी, विरोध, रायगड, उपस्थितीत ,सत्याग्रह)**

---------जिल्ह्यातील महाड तालुक्यात ‘चवदार तळे’ नावाचे एक तळे आहे. स्वातंत्र्यापूर्वी या तळयावर इतर ठिकाणांप्रमाणेच दलितांना पाणी-------- बंदी होती. ‘सर्व लोकांना पाणी मिळावे’ असा कायदा करूनही जातिभेदांमुळे दलितांना चवदार तळयाच्या पाण्याला हात लावण्याची देखील मनाई होती. डॉ.--------- यांनी या जुलमी रूढीचा धिक्कार केला. ‘चवदार तळे’ सर्वांना खुले व्हावे, म्हणून त्यांनी महाड येथे-------- केला. हजारो लोकांच्या----------- २० मार्च १९२७ रोजी डॉक्टर आंबेडकर यांनी स्वतः तळयाचे -------पिऊन एक अन्यायी परंपरा संपवली. दलितांबरोबर सुवर्ण सुधारक देखील या लढ्यात सहभागी झाली होते. अस्पृश्यता पाळणे, माणसांनी एकमेकांना हीन लेखणे अशा विषमतेच्या परंपरांना डॉक्टर आंबेडकरांनी संघटित-------- केला. स्त्रियांना, दलितांना समतेने, समानतेने जगण्याचा हक्क मिळावा म्हणून त्यांनी आयुष्यभर अपार संघर्ष केला. चवदार तळे ही जागा अशाच एका प्रसंगाचे साक्षीदार आहे.

**उतारा क्रमांक -3**

**(मोफत, आर्थिक, सक्तीचे, शिक्षण, प्रगती, दलितांची, शिष्यवृत्त्या)**

' ------ हाच सुधारणांचा पाया आहे'. हा विचार सयाजीराव महाराज यांनी स्वीकारला, समाजाच्या सर्व थरापर्यंत ----- पोहोचले पाहिजे, यासाठी त्यांनी बडोदा संस्थानात प्राथमिक शिक्षण -------व  ------- देण्याचा कायदा केला. अनेक गरीब व हुशार विद्यार्थ्यांना ------- देऊन त्यांना उच्चशिक्षणासाठी --------- मदत करून परदेशी पाठवले. गोरगरिबांची व -------- पिळवणूकीतून  सुटका केली.सर्व जाती-धर्मातील मुलांना शाळांमध्ये प्रवेश देण्यास सांगितले.

**उतारा क्रमांक -४**

**(शौर्याच्या, भीषण ,प्राण ,पुरस्कार, प्रजासत्ताक, दरवर्षी, जीव** )

नाशिकमधील बापू गायधनी यांनी ------- आगीतुन लहान मुलांना आणि जनावरांना वाचवले त्यासाठी त्यांनी स्वतःचा ------ गमावला. स्वातंत्र्य काळातल्या त्यांच्या अतुलनीय -------- स्मरणार्थ, स्वतःचा ------ धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवणाऱ्या शूर मुला-मुलींना 'बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार' दिला जातो. ----- असे जास्तीत जास्त तीन पुरस्कार दिले जाऊ शकतात. ------ दिनाच्या निमित्ताने हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

अशाप्रकारे प्रत्येक आठवड्याला एक उतारा याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याकडून चार उतारे सोडवून घेतले. सुरुवातीच्या दोन उताऱ्यासाठी कंसामध्ये शब्द देण्यात आले होते. उर्वरित दोन उताऱ्यामध्ये विद्यार्थ्यांना स्वतः शब्द भरून उतारे पूर्ण करण्यास सांगितले.  प्रत्येक विद्यार्थ्यास चार उतारे म्हणजे एकूण ८४ उतारे सरावासाठी देण्यात आले.  त्यानंतर साखळी पद्धतीने एकाचा दुसऱ्याला दुसऱ्याला दुसऱ्याला असे उताऱ्याचे वाचन करण्यास सांगितले रिकाम्या जागेत भरलेल्या शब्दांची नोंद वहीत घेण्यास सांगितले.

परिणाम- प्रत्येक उताऱ्याचा शब्द याप्रमाणे ८४ उताऱ्यातील एकूण ५०४ शब्दांचा संग्रह विद्यार्थ्यां जवळ झाला.

**उपक्रम क्रमांक -४. शब्देश्वर कोण ?**

कृती - विद्यार्थ्यांना खेळ कसा खेळावा याविषयी सूचना केल्या . दिलेल्या अक्षरांपासून मिळतील तेवढे शब्द तयार करण्यास सांगितले . अक्षर संख्येची मर्यादा नाही.

वेळ -पंधरा मिनिटे

जास्तीत जास्त शब्द बनविणारा शब्देश्वर ठरेल.

अक्षरे

घ, ढ, रु, णी, न, डी

स वा क ळ प ड

म ती द च ळी ल

ग ळा य प र री

बा ह् चिं को शे गु

बै सा व गा पिं मो

व चि ह् आ का सिं

१)आड २)आकलन ३)आग ४)आकार ५)आवक ६)आपलं ७)आज ८)आळी ९)आगार १०)आज ११)आबा १२)आम १३)आव १४)आवार १५)आळा १६)आणी असे शब्द तयार करता येतील.

**उपक्रम क्रमांक -५**

**शब्दांचे मत्स्यालय**

**उद्देश- शब्दांच्या जाती नुसार प्रत्येक शब्दाचे वर्गीकरण करता येणे, शब्दसंपत्ती वाढविणे.**

**कृती -**वर्गामध्ये चार काचपात्र ठेवण्यात आले. चारही काच पात्रांवर चार वेगवेगळ्या माशांची चित्रे चिकटविण्यात आली. प्रत्येक माशाला अनुक्रमे नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद अशी नावे देण्यात आली. विद्यार्थ्यांना खेळ कसा खेळावा याबद्दल मार्गदर्शन केले. वर्गातील सर्वच २१ विद्यार्थ्यांना प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकातील 11 पाठ नेमून देण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला कोऱ्या कागदी चिठ्ठ्या पुरविण्यात आल्या. विद्यार्थ्यांना चिठ्ठी क्रमांक १, २, ३ असे हजेरी क्रमांक देण्यात आले. प्रत्येकाने नेमून दिलेल्या पाठाचे वाचन करायचे. या पाठातील नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद कमीत कमी पाच- पाच शोधावे व चिठ्ठीवर लिहून त्या त्या काचपात्रात टाकायचे. जो जास्तीत जास्त अचूक शब्द शोधेल तो जिंकेल असे सांगण्यात आले.

**उपक्रम क्रमांक -६  बियातून अंकूरले झाड**

**उद्देश- शब्दकोश निर्माण करणे, शब्दसंपत्ती वाढविणे.**

कृती- सर्वप्रथम विद्यार्थ्यांना तो खेळ कसा खेळायचा या विषयी मार्गदर्शन केले. हा खेळ सर्वच विद्यार्थ्यांना एकाच वेळी स्वतंत्रपणे खेळायचा आहे असे सांगितले. दिलेल्या शब्दातील प्रत्येक अक्षराला एक अंकुर समजा. त्या अंकूरा पासून फांद्या सहित झाड वाढत आहे म्हणजेच अक्षर सुरुवातीस घेऊन शक्य तितक्या शब्दांची यादी तयार कर व त्यांना मुळाक्षरांच्या क्रमाने लावा.

उदा. कमल

क -कबूतर, कचरा, कट्यार, कथन, कडबा, कणा,  कडेकोट, कण

क्रम- कचरा, कट्यार, कडबा, कडेकोट, कण, कणा, कथन, कबूतर

म- मंदिर, मधुकर, मखर, मऊ,  मंडूक, मगर, मणी,  मजकूर, मजा

क्रम- मऊ, मखर, मगर, मजकूर, मजा, मंडूक, मणी,  मंदिर, मधुकर

1. ख र व ड

2. ग फ ल त

3.घ न व ट

4. च ढा ओ ढ

5. छ डी दा र

6. जि म खा ना

7. ध ड प णी

8. ट वा ळ की

9. ठ क वि द्या

10. ड रा व णी

11. ढ व ळ णे

12. त फा व त

13.ध प क न

14. द ड प न

**परिणाम-** काही विद्यार्थ्यांनी त्यांना दिलेली अक्षरे वाचून त्याचा अर्थ विचारला. अक्षरे देताना अशीच अक्षरे देण्यात आली की ज्याचा अर्थपूर्ण शब्द तयार होईल. काही शब्दांचे अर्थ विद्यार्थ्यांना माहीत नव्हते. जे माहीत नव्हते ते विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांजवळील शब्द एकत्र केले असता विद्यार्थ्यांचा ५०० शब्दांचा शब्दकोश तयार झाला.

**उपक्रम क्रमांक-७ मडक्यातील धन शोधा**

**उद्देश- समानार्थी शब्दांच्या जोड्या लावता येणे, शब्दसंपत्ती वाढविणे.**

कृती- विद्यार्थ्यांना मडक्यातील धन कसे शोधावे याविषयी मार्गदर्शन केले. मूळ शब्द लाल रंगाने व समानार्थी शब्द निळया रंगात लिहिलेले आहेत असे सांगितले. जास्तीत जास्त समानार्थी शब्दांच्या जोड्या तयार करणाऱ्या विद्यार्थ्याला शब्दधनी म्हणून घोषित केल्या जाईल.

वेळ दहा मिनिटे

परिणाम- विद्यार्थ्यांनी समानार्थी शब्दांच्या कमीत कमी सात व जास्तीत जास्त वीस जोड्या तयार केल्या.



**उपक्रम क्रमांक -८ विखुरलेल्या मण्यांची माळ**

**उद्देश- दिलेल्या अक्षरातून अर्थ पूर्ण म्हण शोधणे,शब्दसंपत्ती वाढविणे.**

**कृती-** म्हणींच्या  चौकटीचे तक्ते तयार करून घेतले. विद्यार्थ्यांना चौकटीवरून एक म्हण तयार करून दाखविली.  पुढे दिलेल्या चौकटीतील अक्षरांपासून एक अर्थपूर्ण म्हण  तयार होते. अक्षरे म्हणजे विखुरलेले मणी आहेत. ते ओवून माळ तयार करा. अशाप्रकारे विखुरलेल्या मण्यांची माळ विद्यार्थ्यांना तयार करण्यास सांगितले.

| | | |
|---|---|---|
| प | ळ | पा |
| नं | न | च |
| ती | सा | ला |

| | | |
|---|---|---|
| आ | ना | बि |
| ळा | य | त |
| बा | गो | त्या |

| | | | |
|---|---|---|---|
| ध्या | ए | क | र |
| ना | चिं | रा | भ |
| भा | ड | ध | |

| | | | |
|---|---|---|---|
| ति | चा | बै | मा |
| का | अ | रि | त्या |
| ल | श | हा | णा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पा | अ | री | ड | वा |
| य | ध | ह | ढ | ला |
| गा | चे | री | | |

परिणाम -विद्यार्थ्यांनी अचूक म्हणी तयार केल्या.

**उपक्रम क्रमांक -९**

**अचूक प्रतिमा शोधा**

**उद्देश- वाक्प्रचारांचा उपयोग ओळखता येणे, शब्दसंपत्ती वाढविणे.**

कृती- सर्वप्रथम विद्यार्थ्यांना अचूक प्रतिमा शोधा या खेळा बाबत माहिती दिली. वेळ दहा मिनिटे. एका वाक्प्रचाराला एक गुण. खालील तीन वाक्प्रचारांचा एक गट आहे. दहा गट दिलेले आहेत. प्रत्येक गटात एका शब्दप्रयोगाच्या तीन छटा आहेत. ही तीन भिन्न वाक्ये म्हणजे तीन आरसे व तीन छटा. अर्थात तीन प्रतिमा यापैकी वाक्प्रचाराच्या अर्थाची एकच प्रतिमा आहे. वाक्ये काळजीपूर्वक वाचा व वाक्प्रचाराची अचूक प्रतिमा ओळखा.

**1.**

अ) अर्जुनाने पाण्यात पाहून माशाचा डोळा फोडला.

ब) शत्रूच्या घोड्यांनी संताजी,धनाजीला पाण्यात पाहिले.

क)कौरव-पांडवांना पाण्यात पाहत.

**2.**

अ )आईने पोळया करण्यासाठी कणीक तिंबली.

ब ) कमलला पोळया करता येत नव्हत्या म्हणून आईने तिची चांगलीच कणिक तिंबली.

क ) कणीक चांगली तिंबली तर पोळया चांगल्या होतात.

3.

अ )तीन दिवसानंतर शुद्धीवर येऊन सुनीताने डोळे उघडले.

ब )बऱ्याच दिवसानंतर पावसाने डोळे उघडल्यामुळे शेतकरी आनंदात होते.

क )आपल्या प्रगती पुस्तकातील लाल रेघा पाहून मधूचे डोळे उघडले.

4.

अ )आपल्या मुलाला नेहमी पाठीशी घालूनच आई बोलत असते.

ब )आपल्या बाळाला पाठीशी घालून ती बाई शेतावर चालली होती.

क) घोंगडी पाठीशी घालून शेतकरी घरी निघाले होते.

5.

अ )खेळता खेळता महेशचा दगडाखाली हात सापडला.

ब ) दगड फोडताना त्याचा हात दगडाखाली सापडला.

क )मुलीच्या लग्नात रामरावांना सगळ गप्प राहून ऐकावं लागलं कारण त्यांचा हात दगडाखाली सापडला होता.

6.

अ )हिवाळा सुरू झाल्यामुळे आईच्या सांधेदुखीने डोके वर काढले.

ब ) सकाळ होताच डोंगराच्या मागून सूर्याने डोके वर काढले.

क ) पांघरूना आडून बाळाने हळूच डोके वर काढले.

7.

अ ) सुट्टीच्या दिवशी मुलांच्या दंग्यामुळे मी हात टेकले.

ब ) आजी नेहमी हात टेकून उठते.

क ) बाळ भिंतीला हात टेकून उभे राहते.

8.

अ ) जास्त जेवल्यामुळे बंड्याच्या पोटात दुखू लागले.

ब ) हसून-हसून आमच्या पोटात दुखू लागले.

क ) माझा उत्कर्ष पाहून शेजाऱ्याच्या पोटात दुखू लागले.

9.

अ )तहानलेल्यांना पाणी पाजण्यासारखं पुण्य दुसरं नाही.

ब )आई बाळाला चांदीच्या चमच्याने पाणी पाजत होती. क )शिवाजी महाराजांनी अफजलखानाला चांगलेच पाणी पाजले.

10.

अ ) घरात पूजेसाठी देखील गंध नव्हता.

ब )बोगनवेलीचं फुल सुंदर होतं पण त्याला कसलाही गंध नव्हता.

क ) घरात राहूनही मुलांच्या भांडणाचा मला गंध नव्हता.

परिणाम- विद्यार्थ्यांनी वाक्प्रचाराच्या अर्थाची प्रतिमा शोधण्याचा प्रयत्न केला. परंतु २१ पैकी ६ विद्यार्थ्यांनी अचूक प्रतिमा ओळखल्या. वाक्प्रचारांच्या प्रतिमा न ओळखलेल्या विद्यार्थ्यांचा पुन्हा खेळ घेतला तेव्हा १५ विद्यार्थ्यांनी अचूक प्रतिमा ओळखल्या.

**उपक्रम क्रमांक -१०**

**अक्षर पाकळ्या आणि शब्दफुले**

उद्देश - तीन अक्षरी आणि चार अक्षरी शब्द फुले बनविणे. शब्द संपत्ती वाढविणे, समानार्थी शब्दांचा सराव.

कृती- विद्यार्थ्यांना प्रथम खेळ कसा खेळायचा ते समजावून सांगितले. प्रत्येक विद्यार्थ्याला वेळ पाच मिनिटे.

समोरील टोपलीत आठ अक्षर पाकळ्या विखुरलेल्या आहेत. त्याच्या पासून तीन अक्षरी पाकळ्यांची दिलेल्या अर्थाकरिता शब्दफुले तयार करा. जास्तीत जास्त शब्द तयार करणारा जिंकेल.

**खेळ क्रमांक -१.**

ग, म, र, स, उ, अ, आ

उदा. एक जलचर प्राणी- मगर

1)युद्ध 2)भांडार 3)उत्पत्तिस्थान 4)ज्याला मरण नाही असा

5) उष्ण 6)चांगला

**खेळ क्रमांक-२**

वरील प्रमाणे खाली दिलेल्या अक्षर पाकळ्यात दोन अक्षरी शब्दफुले दडलेली आहेत. ती शोधा व त्यांचे द्वित्व करून खालील अर्थाचे शब्दफुले मिळवा.

ग, म, भ, र, स, ख, थ उदा. गिरकी घेणे --गर-गरगर

1) कष्ट करणे

2)जलद काम करणे 3)अविरोध पुढे जाणे 4)रेडिओवर कधीकधी होणारा एक प्रकारचा आवाज

5)एक प्रकारचे कापणे

परिणाम- खेळ क्रमांक 1 व 2 मध्ये सर्व विद्यार्थी सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 12 शब्दफुले तयार केली.

विद्यार्थ्यांच्या खेळातील सहभागाचे मूल्यमापन करण्यासाठी पदनिश्चयन श्रेणीचा वापर करण्यात आला त्यावरून असे दिसून आले की विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत अधिक वाढ

होण्यासाठी आणखी काही भाषिक खेळ घेण्याची गरज आहे त्यानुसार नियोजन करून **पुढील आवर्तन एक (** खेळ घेण्यात आले)

**आवर्तन १**

**उपक्रम -११**

**पळालेला पकडा**

उद्देश- शब्दसंपत्ती वाढविणे.मुलांना फळयावर काही शब्द लिहून दिले. दिलेल्या शब्दातील एक अक्षर पळालेले आहे ते शोधा. प्रत्येक गटात एकच अक्षर पळालेले आहे. त्या गटातील प्रत्येक शब्दात ते एकदा आलेले आहे. तीन विद्यार्थी मिळून एका खेळातील अक्षरे शोधण्यासाठी तीन विद्यार्थ्यांचा एक याप्रमाणे 7 गट तयार केले. सात गटांना सात खेळ सोडविण्यास सांगितले.

**खेळ 1.**

जयवि--य, जड--वाहीर, जहा--, जय--वान

**खेळ 2.**

घरदा--, प--कर, दरबा--, सहका-- ,भ- दार

**खेळ 3.**

ता--माड, ग--बड, गो--धोड , भां--कुदळ, झा--झूड

**खेळ 4**

ता--मेळ, का—वेळ, जा--पोळ, अक्रा--विक्राळ

**खेळ 5**

उ--सतापास, पारं--रिक, पानसु--री, पाऊस--णी, पाट--णी

**खेळ क्र. 6**

मनोका--ना, मत--तांतर, मदन--स्त, मधो--ध, मत--तैक्य

**खेळ सात**

उपासतापा--, ध--मुसळ, उलटतपा--, सड--डीत, सर--कट

परिणाम

प्रत्येक विद्यार्थ्याने अपेक्षेप्रमाणे पळालेले अक्षर शोधून शब्द पूर्ण केले.

**उपक्रम क्रमांक -१२**

**शब्दकोडे**

उद्देश - शब्दसंपत्ती वाढविणे.

कृती- विद्यार्थ्यांना शब्दकोडे कसे सोडवायचे याचे प्रात्यक्षिक स्वतः एक शब्द कोडे सोडवून करून दाखविले. काही विद्यार्थ्यांना सोडविता येत होते. शब्दकोडे लिखित कागद विद्यार्थ्यांना दिले. दोन विद्यार्थी मिळून एक शब्दकोडे सोडविण्यास दिले.

वेळ २०मिनिटे.

शब्दकोडे क्रमांक १

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ |
| | | ४ | | |
| ५ | ६ | | | |
| | ७ | | | |
| ९ | | | | |
| | १० | | | |

**आडवे शब्द**

१)जंगलात लागलेली आग

४)भर,तोल, मान ,इज्जत

५)गोणपाट

७)पाण्याचा आवाज

९)उन्हाळयात हा स्पर्श सुखावह वाटतो.

१० )कावळा सगळीकडचे हे स्वच्छ करतो.

**उभे शब्द**

१) वर्षाचा पहिला ऋतू

२)वर्तुळाकार फिरणारा वारा

३)दिवस

६)शुष्कता ,आग

८)दगड

शब्दकोडे क्रमांक -२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | ३ | | | ४ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| ५ | | | | | ६ | | | |
| | | | | | | | | |
| ७ | | | ८ | | ९ | | | १० |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| ११ | | | | | १२ | | | |

**आडवे शब्द**

१)रानात सापडणारा खाऊ

३)राजाचे घर

५)सांगड घालणे

६)फोलपट ,सालपट

७)राजदरबार

९)राष्ट्राच्या मानाचे प्रतिक

११ )मालक,नवरा

१२)तंबूसाठी वापरण्यात येणारे कापड

**उभे शब्द**

१) राजाची आई

२)तुफान,वादळ

३)कारकीर्द

४) पोकळ थाटमाट

७) राजकारणाशी संबंधित

८)नशीबवान

९)गांधीजींचा बहुमान

१०) आई

**शब्दकोडे क्रमांक -3**

उभेशब्द

२)चाकणच्या किल्ल्याचा किल्लेदार(4)


३) बडा सय्यद लाख ठार करणारा (6)

४)रायबाच्या लग्नाचे आमंत्रण शिवरायांना देण्यासाठी तानाजीच्या बरोबर आलेला (5)

७) घोडखिंड लढताना आत्मबलिदान देणारा (चार)

९) कोंढाण्याच्या मोहिमेत कड्याचे दोर कापणारा( 3)

१०) कोंढाणा सर करताना धारातीर्थी पडलेला (तीन)




आडवे शब्द

१)शिवरायांसाठी लाल महाल बांधणारे(4)

३)वीरमाता म्हणून संबोधिलेल्या (4)

५) स्वराज्याची स्थापना करणारे (३)

६)पुरंदरच्या लढाईत वीरश्रीचे मरण आलेला (5)

८)बंगळूरची जहागीर मिळालेले आदिलशहाचे सरदार (३)

११)प्रतिशिवाजी म्हणून ख्याती असलेले सेनापती (7)

**परिणाम-** शब्दकोडे सोडविताना विद्यार्थ्यांना सुरुवातीला अवघड वाटले. सराव झाल्यानंतर विद्यार्थी भराभर शब्दकोडे सोडवू लागली. शब्दकोडे सोडविणे या खेळातून नवीन शब्द, समानार्थी शब्द, वाक्प्रचार विद्यार्थ्यांनी स्वतः शोधून, आठवून लिहिले.

**उपक्रम क्रमांक -१३**

**शब्दांशी दोन हात करा**

**उद्देश- विस्कळीत अक्षरे आशयानुसार लावून शब्द तयार करणे. शब्दसंपत्ती वाढविणे.**

कृती- वर्गाची पटसंख्या एकवीस असल्यामुळे दोन गट तयार करताना एका गटामध्ये अकरा विद्यार्थी व दुसऱ्या गटामध्ये दहा विद्यार्थी घेतले. असे दोन गट तयार केले. दोन्ही गट समोरासमोर बसविले. एका गटाकडे अक्षरपट्ट्या दिल्या तर दुसऱ्या गटाकडे त्या अर्था करता वापरण्यात येणाऱ्या शब्दांच्या पट्ट्या दिल्या. प्रथम गटातील एका मुलाने दिलेल्या अक्षरपट्टी मधून एक अक्षर पट्टी उचलायची. दुसऱ्या गटाने त्या अक्षरांच्या अर्थाचा शब्द शोधून अवघ्या तीस सेकंदामध्ये दाखवायचा. अशाप्रकारे दोन गटांमध्ये हा खेळ घेतला. वेळेमध्ये योग्य उत्तर देणाऱ्या गटाला दोन गुण दिले. अशा प्रकारे आलटून-पालटून हा खेळ घेतल्यामुळे सर्वात जास्त गुण मिळविणारा गट विजयी ठरला.

| | |
|---|---|
| १) ब न शी न वा | भाग्यवान |
| २) ग्णा रु य ल | दवाखाना |
| ३) ह नो म र | चित्तहर्षक |
| ४)रु नि गी प यो | उपयोगी नसलेला |
| ५) र्भ ग मं श्री त | जन्मजात श्रीमंत |
| ६)र र भ पू | खूप जास्त |
| ७)शा णे श्री ग | सुरुवात |
| ८)ख मु भ स्तं | अबोल |
| ९)था ड क भा क | खोट्या रटाळ कथा |
| १०)क कुं र्ण भ | झोपाळू |
| ११)क्ष त्रू अ र श | निरक्षर |
| १२)क अ ल्पि त | मनी नसलेला |
| १३)ध्या अ न प | शिकवणे |
| १४) डी क मो व ल | क्षुल्लक किंमतीचे |
| १५) ड त दं व | साष्टांग नमस्कार |
| १६)री पा चा द | पायी चालणारे |

१७) र ण क्ष भं गु नश्वर

**परिणाम-** विद्यार्थ्यांना १७ समानार्थी शब्द ओळखता आले. आशयानुसार शब्द ओळखण्याचा सराव झाला.

**उपक्रम क्रमांक -१४**

**पाहुणा कोण ?**

**उद्देश- समानार्थी शब्दांची माहिती होणे, शब्दसंपत्ती वाढविणे.**

कृती- विद्यार्थ्यांना फळयावर शब्द लिहून दिले. प्रत्येक शब्दापुढे तीन शब्द लिहिले. त्यातील दोन शब्द समानार्थी व तिसरा शब्द वेगळा असलेला म्हणजे तो शब्द पाहुणा आलेला आहे. त्यास तुम्ही ओळखून त्या पुढे ही खूण करायची आहे. ज्या विद्यार्थ्यास जास्त गुण मिळतील तो जिंकेल.

| | | | |
|---|---|---|---|
| १. महिमा – | महत्व | मोठेपण , | कीर्ती |
| २. उत्पन्न- | निर्माण | जन्मलेले, | मिळकत |
| ३. विस्तव – | आग | अग्नि , | निखारा |
| ४. ध्वज – | निशाण | झेंडा, | खूण |
| ५. कुतूहल – | जिज्ञासा | नवल , | उत्सुकता |
| ६. सूर्य – | भानू | इंद्र , | दिनकर |
| ७. चंद्र – | वरूण | शशी , | इंदू |
| ८. हात - | चरण | हस्त , | कर |
| ९. पर्वत - | अहि , | नग , | तुंग |
| १०.वारा - | पवन, | पतंग, | वायू |
| ११.समुद्र - | रत्नाकर , | इंदू , | सागर |
| १२.नदी - | सरिता , | तटिनी , | वाहिनी |
| १३.व्यर्थ - | फुकट | वाया , | महाग |
| १४.श्रम - | काम , | कष्ट , | श्रमदार |
| १५.चेतोहर - | सुंदर , | मनोहर , | हिरवा |

**उपक्रम क्रमांक -१५**

## चित्रात दडलेले वाक्प्रचार व म्हणी

**उद्देश- वाक्प्रचार यांचे,म्हणीचे आकलन होणे, शब्दसंपत्ती वाढविणे.**


कृती- प्रत्येक विद्यार्थ्याला २ याप्रमाणे वर्गातील २१ विद्यार्थ्यांना चित्रांचे वाटप केले. त्या चित्रावरून तुम्हाला वाक्प्रचार ओळखायचे आहेत. पहा बरे जमते का ? पण हसू नका हं ! चित्र पाहून वाक्प्रचार वहीत लिहायचा व आपल्या जवळील चित्र आपल्या पुढील क्रमांकाच्या विद्यार्थ्याला द्यायचे २१ क्रमांकाच्या विद्यार्थ्याने १ क्रमांकाला आपले चित्र द्यायचे. अशा प्रकारे ४२ चित्रे पाहून जास्तीत जास्त वाक्प्रचार तयार झाले पाहिजे. पाहुया कोण सर्वात लवकर वाक्प्रचार तयार करता ते.

















उपक्रम राबवून झाल्यानंतर नवोपक्रमाची यशस्विता तपासण्यासाठी विद्यार्थ्यांची ३० गुणांची अंतिम चाचणी घेण्यात आली.

**उत्तर चाचणीतील विद्यार्थ्यांचा गुण दर्शवणारा तक्ता.**

| रोल नं. | प्रश्न | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गुण | २ | २ | ६ | २ | ४ | ३ | ३ | २ | ३ | ३ | ३० | |
| १ | | २ | २ | ६ | २ | ४ | ३ | ३ | २ | ३ | ३ | २० | |
| २ | | २ | २ | ४ | २ | ४ | २ | २ | २ | ३ | ३ | २६ | |
| ३ | | २ | २ | ६ | २ | ४ | २ | २ | २ | ३ | ३ | २८ | |
| ४ | | २ | २ | ६ | २ | ४ | २ | २ | २ | ३ | ३ | २८ | |
| ५ | | २ | २ | ३ | २ | २ | २ | २ | २ | ३ | २ | २२ | |
| ६ | | २ | २ | २ | २ | २ | २ | १ | २ | १ | १ | १७ | |
| ७ | | २ | २ | ३ | २ | १ | २ | २ | २ | १ | २ | १९ | |
| ८ | | २ | २ | ६ | २ | ४ | ३ | ३ | २ | ३ | ३ | ३० | |
| ९ | | २ | २ | ६ | २ | ४ | ३ | ३ | २ | ३ | ३ | ३० | |
| १० | | २ | २ | ६ | २ | ४ | ३ | ३ | २ | ३ | ३ | ३० | |
| ११ | | २ | २ | ६ | २ | ४ | ३ | ३ | २ | ३ | ३ | ३० | |
| १२ | | २ | २ | २ | १ | १ | २ | १ | २ | १ | १ | १५ | |
| १३ | | २ | २ | ३ | २ | ३ | २ | २ | २ | ३ | ३ | २४ | |
| १४ | | २ | २ | ३ | २ | २ | २ | ३ | २ | ३ | २ | २३ | |
| १५ | | २ | २ | ३ | २ | २ | २ | ३ | २ | ३ | २ | २३ | |
| १६ | | २ | २ | ३ | २ | ३ | २ | २ | २ | ३ | ३ | २४ | |
| १७ | | २ | २ | ४ | २ | ४ | २ | २ | २ | ३ | ३ | २६ | |
| १८ | | २ | २ | ३ | २ | २ | ३ | ३ | २ | ३ | ३ | २५ | |
| १९ | | २ | २ | ६ | २ | ४ | ३ | ३ | २ | ३ | ३ | ३० | |
| २० | | २ | २ | ६ | २ | ४ | ३ | ३ | २ | ३ | ३ | ३० | |
| २१ | | २ | २ | ६ | २ | ४ | ३ | ३ | २ | ३ | ३ | ३० | |

## प्राप्त माहितीचे विश्लेषण

पूर्व चाचणीतील विदयार्थ्यांचे प्रतिसाद

| अ.क्र. | प्रश्नावली | ५० टक्के पेक्षा जास्त गुण असलेले विदयार्थी | शेकडा प्रमाण | ५० टक्के पेक्षा कमी गुण असलेले विदयार्थी | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | गाळलेली अक्षरे शोधणे | ०९ | ४३% | १२ | ५७% |
| २ | पळालेली अक्षरे शोधणे | ०८ | ३८% | १३ | ६२% |
| ३ | उताऱ्याच्या आशयानुसार शब्द रिकाम्या जागेत भरणे | ११ | ५२% | १० | ४८% |
| ४ | शब्द तयार करणे | ०६ | २९% | १५ | ७१% |
| ५ | दिलेल्या उताऱ्यातील शब्दांचे शब्दांच्या जाती नुसार वर्गीकरण करणे | ०९ | ४३% | १२ | ५७% |
| ६ | आकारविल्हे शब्दांचा क्रम लावणे | १८ | ८६% | ३ | १४% |
| ७ | समानार्थी शब्द लिहिणे | ११ | ५२% | १० | ४८% |
| ८ | चौकटीतील अक्षरापासून अर्थपूर्ण म्हण तयार करणे | १३ | ६२% | ०८ | ३८% |
| ९ | वाक्यप्रचाराचा वाक्यात उपयोग करणे | १० | ४८% | ११ | ५२% |
| १० | शब्दसमूहासाठी एक शब्द सुचवणे | १० | ४८% | ११ | ५२% |

अंतिम  चाचणीतील विदयार्थ्यांचे प्रतिसाद

| अ.क्र. | प्रश्नावली | ५० टक्के पेक्षा जास्त गुण असलेले विदयार्थी | शेकडा प्रमाण | ५० टक्के पेक्षा कमी गुण असलेले विदयार्थी | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | गाळलेली अक्षरे शोधणे | २१ | १००% | - | - |
| २ | पळालेली अक्षरे शोधणे | २१ | १००% | - | - |
| ३ | उताऱ्याच्या आशयानुसार शब्द रिकाम्या जागेत भरणे | १९ | ९०% | २ | १०% |
| ४ | शब्द तयार करणे | २० | ९५% | १ | ५% |
| ५ | दिलेल्या उताऱ्यातील शब्दांचे शब्दांच्या जाती नुसार वर्गीकरण करणे | १९ | ९०% | २ | १०% |
| ६ | आकारविल्हे शब्दांचा क्रम लावणे | २१ | १००% | - | - |
| ७ | समानार्थी शब्द लिहिणे | १९ | ९०% | २ | १०% |
| ८ | चौकटीतील अक्षरापासून अर्थपूर्ण म्हण तयार करणे | २१ | १००% | - | - |
| ९ | वाक्यप्रचाराचा वाक्यात उपयोग करणे | १८ | ८६% | ३ | १४% |
| १० | शब्दसमूहासाठी एक शब्द सुचवणे | १८ | ८६% | ३ | १४% |

पूर्व व अंतिम चाचणीतील तुलना

| | | पूर्व चाचणी | | | | अंतिम चाचणी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रश्नावली | ५० टक्के पेक्षा जास्त गुण असलेले विदयार्थी | शेकडा प्रमाण | ५० टक्के पेक्षा कमी गुण असलेले विदयार्थी | शेकडा प्रमाण | ५० टक्के पेक्षा जास्त गुण असलेले विदयार्थी | शेकडा प्रमाण | ५० टक्के पेक्षा कमी गुण असलेले विदयार्थी | शेकडा प्रमाण |
| १ | गाळलेली अक्षरे शोधणे | ०९ | ४३% | १२ | ५७ % | २१ | १०० % | - | - |
| २ | पळालेली अक्षरे शोधणे | ०८ | ३८% | १३ | ६२ % | २१ | १०० % | - | - |
| ३ | उताऱ्याच्या आशयानुसार शब्द रिकाम्या जागेत भरणे | ११ | ५२% | १० | ४८ % | १९ | ९० % | २ | १०% |
| ४ | शब्द तयार करणे | ०६ | २९% | १५ | ७१ % | २० | ९५ % | १ | ५% |
| ५ | दिलेल्या उताऱ्यातील शब्दांचे शब्दांच्या जाती नुसार वर्गीकरण करणे | ०९ | ४३% | १२ | ५७ % | १९ | ९० % | २ | १०% |
| ६ | आकारविल्हे शब्दांचा क्रम लावणे | १८ | ८६% | ३ | १४ % | २१ | १०० % | - | - |
| ७ | समानार्थी शब्द लिहिणे | ११ | ५२% | १० | ४८ % | १९ | ९० % | २ | १०% |
| ८ | चौकटीतील अक्षरापासून अर्थपूर्ण म्हण तयार करणे | १३ | ६२% | ०८ | ३८ % | २१ | १०० % | - | - |
| ९ | वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करणे | १० | ४८% | ११ | ५२ % | १८ | ८६ % | ३ | १४% |
| १० | शब्दसमूहासाठी एक शब्द सुचवणे | १० | ४८% | ११ | ५२ % | १८ | ८६ % | ३ | १४% |

प्रश्न क्रमांक१: मध्ये पूर्व चाचणीला ९ विद्यार्थी म्हणजे ४३ टक्के विद्यार्थी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. तर अंतिम चाचणीमध्ये २१ विद्यार्थी म्हणजे १०० टक्के विद्यार्थी ५० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. याचाच अर्थ ४७ टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती आढळून आली.

प्रश्न क्रमांक २: मध्ये पूर्व चाचणीला ८ विद्यार्थी म्हणजे ३८ टक्के विद्यार्थी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. तर अंतिम चाचणीमध्ये २१ विद्यार्थी म्हणजे १०० टक्के विद्यार्थी ५० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. याचाच अर्थ ६२ टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती आढळून आली.

प्रश्न क्रमांक ३: मध्ये पूर्व चाचणीला ११ विद्यार्थी म्हणजे ५२ टक्के विद्यार्थी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. तर अंतिम चाचणीमध्ये १९ विद्यार्थी म्हणजे ९०टक्के विद्यार्थी ५०टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. याचाच अर्थ३८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती आढळून आली.

प्रश्न क्रमांक ४: मध्ये पूर्व चाचणीला ६ विद्यार्थी म्हणजे २९ टक्के विद्यार्थी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. तर अंतिम चाचणीमध्ये २० विद्यार्थी म्हणजे ९५ टक्के विद्यार्थी ५० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. याचाच अर्थ ६६टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती आढळून आली.

प्रश्न क्रमांक ५: मध्ये पूर्व चाचणीला ९ विद्यार्थी म्हणजे ४३ टक्के विद्यार्थी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविनारे आहेत. तर अंतिम चाचणीमध्ये १९ विद्यार्थी म्हणजे ९० टक्के विद्यार्थी ५० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. याचाच अर्थ ४७ टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती आढळून आली.

प्रश्न क्रमांक ६: मध्ये पूर्व चाचणीला १८ विद्यार्थी म्हणजे ८६ टक्के विद्यार्थी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. तर अंतिम चाचणीमध्ये २१ विद्यार्थी म्हणजे १०० टक्के विद्यार्थी ५० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. याचाच अर्थ १४ टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती आढळून आली.

प्रश्न क्रमांक ७: मध्ये पूर्व चाचणीला ११ विद्यार्थी म्हणजे ५२ टक्के विद्यार्थी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. तर अंतिम चाचणीमध्ये १९ विद्यार्थी म्हणजे ९०टक्के विद्यार्थी ५० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. याचाच अर्थ ३८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती आढळून आली.

प्रश्न क्रमांक ८ मध्ये पूर्व चाचणीला १३ विद्यार्थी म्हणजे ६२टक्के विद्यार्थी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. तर अंतिम चाचणीमध्ये २१विद्यार्थी म्हणजे १०० टक्के विद्यार्थी ५० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. याचाच अर्थ३८ टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती आढळून आली.

प्रश्न क्रमांक ९  मध्ये पूर्व चाचणीला १० विद्यार्थी म्हणजे ४८ टक्के विद्यार्थी   पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. तर अंतिम चाचणीमध्ये १८विद्यार्थी म्हणजे ८६ टक्के विद्यार्थी ५०टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. याचाच अर्थ **३८** टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती आढळून आली.

प्रश्न क्रमांक १०:  मध्ये पूर्व चाचणीला १०विद्यार्थी म्हणजे ४८ टक्के विद्यार्थी  पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. तर अंतिम चाचणीमध्ये १८ विद्यार्थी म्हणजे ८६ टक्के विद्यार्थी ५० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणारे आहेत. याचाच अर्थ **३८** टक्के विद्यार्थ्यांमध्ये प्रगती आढळून आली.

साधारणपणे या नवोपक्रमानंतर मुलांमध्ये कमालीचा बदल दिसून आला.मुलांचा शब्दसाठा खूप मोठ्या प्रमाणात वाढला.स्वलेखनात,बोलण्यात  म्हणी वाक्प्रचाराचा वापर करायला लागली.

**उपक्रमाची यशस्विता**

१.पूर्व चाचणीद्वारे विद्यार्थ्यांच्या सद्यस्थितीचा शोध घेतला असता त्यावरून उपक्रमाची रूपरेषा ठरविण्यात पूर्वचाचणी अतिशय उपयुक्त ठरली  आहे.

२.विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्ती विकसनासाठी केलेली उपक्रम निर्मिती परिणामकारक ठरली आहे.

३शब्दसंपत्ती विकसनासाठी सराव, मूल्यमापन साधन लक्षणीय प्रमाणात परिणामकारक ठरले आहेत.

४.शब्दसंपत्ती विकसनासाठी निर्माण केलेल्या साधनांच्या सहाय्याने केलेली उपक्रमांची अंमलबजावणी अतिशय उपयुक्त ठरलेली आहे.

५.शब्दसंपत्ती विकसनासाठी निर्माण केलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या मातृभाषेचा शब्दसाठा लक्षणीय प्रमाणात विकसित झाला आहे.

**शिक्षकांसाठी उपयोजन**

१.प्रस्तुत नवोपक्रम मराठी भाषा अध्यापन करणाऱ्या प्रत्येक शिक्षकांसाठी उपयुक्त ठरेल.

२.नवोपक्रमामध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा मनोरंजनात्मक खेळाद्वारे भाषिक कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी व शब्दसंपत्ती मध्ये वाढ करण्यासाठी उपयोग होऊ शकतो.

३.विविध उपक्रमांद्वारे शिक्षकांना शैक्षणिक साधन निर्मिती करता येईल.

४. ग्रामीण भागातील शिक्षकांना भाषा विषयाचे अध्यापन करताना सदरील नवोपक्रम उपयुक्त ठरेल.

## समारोप

कोरोना महामारीच्या काळात ' शाळा बंद पण शिक्षण चालू होते.' याला माझा वर्गही अपवाद नव्हता. आमच्या तालुक्याचे आदरणीय गटशिक्षणाधिकारी पठाण साहेब यांनी गेल्या वर्षी आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण या विषयावर आमची आठ दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा घेतली होती. या प्रशिक्षणातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली विद्यार्थ्यांना प्रेरित केल्यानंतर, विविध आव्हाने देऊन, स्वयंअध्ययनाच्या साह्याने, विविध खेळ व कृतीद्वारे मुलांचा भाषिक विकास साधता येतो. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया गतिमान करता येते. हे जाणून हा नवोपक्रम मी हाती घेतला. मी या वर्गावर गेल्या तीन वर्षांपासून सुलभक म्हणून काम पाहत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत होती, ती म्हणजे मुलांचा भाषिक विकास झालेला नव्हता. मुले बोलण्यात अडखळत होती, नवीन व्यक्तीसोबत विचारलेल्या प्रश्नांना प्रतिसाद देत नव्हती, भाषणात पुढाकार घेत नव्हती, ऑनलाईन क्लासमध्ये मुलांचा अल्प प्रतिसाद राहत होता, मुले लिखाणात असंख्य चुका करत असत, वाक्यात उपयोग करता न येणे, सारख्या अर्थाचे शब्द ओळखता न येणे अशा असंख्य गोष्टी मला जाणवत होत्या. म्हणून मुलांच्या भाषिक समृद्धीसाठी हा नवोपक्रम हाती घेतला. या नवोपक्रमातील एकूण पंधरा उपक्रमातून मला विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत खूप मोठ्या प्रमाणात वाढ करण्यास मदत झाली. मुले बोलताना म्हणीचा वापर करू लागली. अक्षर समूहापासून असंख्य शब्द तयार करू लागली. मुलांच्या लेखनात सुधारणा झाल्या. विविध शब्दकोडे यामुळे मुलांच्या शब्दसंपत्तीत वाढ झाली. नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद मुलांना सहज कळायला लागले. एकंदरीत भाषिक विकास होण्यास या पंधरा उपक्रमाची खूप मोठी मदत झाली. शाळा चालू नसतानाही भाषिक खेळामुळे अभ्यास गटात मुले रमायला लागली. इयत्ता चौथीच्या मराठी विषयातील विविध अध्ययन निष्पत्तीची फलनिष्पत्ती पाहावयास मिळाली. सुलभक म्हणून माझा हा नवोपक्रम माझ्या मुलांना खूप काही शिकवून गेला.

धन्यवाद !

## संदर्भसूची


| **अ.क्र.** | **पुस्तकाचे नाव** | **लेखक / प्रकाशन** |
| --- | --- | --- |
| ०१ | बालभारती इयत्ता चौथी | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे |
| ०२ | कृतिसंशोधन व नवोपक्रम, अध्यापक शिक्षण पदविका, डीएड द्वितीय वर्षासाठी | 14 नोव्हेंबर 2006 |
| ०३ | मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी | वहिनकर गो. द.<br>2007 |
| ०४ | भाषिक खेळ | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे.<br>जीवन शिक्षण |
| ०५ | शैक्षणिक नवोपक्रम | श्री.एस.आर.माशाळे |

## परिशिष्टे

### क) विदयार्थी यादी

| रोल नं. | विद्यार्थ्यांची नावे | वर्ग |
|---|---|---|
| १ | प्रतिक्षा बालाजी जयतपाळ | चौथा |
| २ | कावेरी जनार्धन गाजरे | चौथा |
| ३ | सोनाक्षी सुरेश मस्के | चौथा |
| ४ | साक्षी आश्रोबा भोसले | चौथा |
| ५ | कीर्ती अशोक शिंदे | चौथा |
| ६ | मयुरी कैलास भोळे | चौथा |
| ७ | निकिता ओमप्रकाश धोंडगे | चौथा |
| ८ | आरती लिंबाजी गाजरे | चौथा |
| ९ | निकिता हनुमान शिंपले | चौथा |
| १० | मुंजा अशोक गरुड | चौथा |
| ११ | शिवम परमेश्वर जामकर | चौथा |
| १२ | कृष्णा सुरेश पवार | चौथा |
| १३ | ऋषिकेश ज्ञानेश्वर धोंडगे | चौथा |
| १४ | समर्थ गजानन धोंडगे | चौथा |
| १५ | संदेश बालाजी सरवदे | चौथा |
| १६ | कृष्णा काशिनाथ जयतपाळ | चौथा |
| १७ | आदित्य बिभीषण काळे | चौथा |
| १८ | आनंद भास्कर खंदारे | चौथा |
| १९ | यश लिंबाजी हरगावकर | चौथा |
| २० | शिवम योगीराज धोंडगे | चौथा |
| २१ | सागर श्रीकिशन धोंडगे | चौथा |

## परिशिष्ट (ख)

## पूर्व चाचणी प्रश्नावली

विषय : मातृभाषा मराठी.                    वर्ग : ४ था

एकूण गुण : 30                    रोल नंबर :

विद्यार्थ्यांचे नाव : --------------------------------------------

---

प्रश्न 1 ला : खाली दिलेल्या अक्षरांपासून तीन अक्षरी अर्थपूर्ण शब्द तयार करा. (2)

1) च          2) प

प्रश्न 2 रा : शब्दाच्या सुरूवातीला किंवा शेवटी अक्षर जोडून नवीन शब्द तयार करा. (2)

1) जन्म 2) स्पर्धा

प्रश्न 3 रा : दिलेल्या उताऱ्याच्या आशयानुसार शब्द निवडून रिकाम्या जागेत भरा. (6)

( खेळ, प्रयत्न, आजोबा, अंधारात, कवितेची, सहजच )

एकदा सायंकाळच्या वेळी मी आणि ................ घरी निघालो होतो. माझ्या आजोबांना नीटसे ................ दिसत नसे. त्यामुळे मी त्यांना हाताला धरून नेत होते. त्यांनी ....................मला विचारले, " हे बघ मी आता ...................ओळ म्हणतो. तू ती कविता पूर्ण करशील ? चांगली प्रसिद्ध कविता आहे. मी म्हणाले, " ................. करीन." आम्ही हा खेळ खूप खेळायचो.

प्रश्न 4 था : चार अक्षरी दोन शब्द लिहा. (2)

प्रश्न 5 वा : खालील वाक्यातील नाम ओळखा. (4)

1) मधूने साने बाईचे घर सोडले.

2) काय रे पोरा? ही पुस्तके कोणाची ?

प्रश्न 6 वा : पुढील शब्द मूळाक्षराच्या क्रमाने लिहा. (3)

1) अकरा, अंगण, अवकळा, अतिथी, अप्रिय, अस्वल

2) प्रज्ञा, प्रयोग, प्रतिपदा, प्रसिद्धी, प्राची, प्रणय

प्रश्न 7 वा : समानार्थी शब्द लिहा. (3)

1)झाड

2) युक्ती

3) स्वैर

प्रश्न 8 वा : दिलेल्या अक्षरांपासून अर्थपूर्ण म्हण तयार करा. (2)

| | | |
|---|---|---|
| पा | घ | ल |
| थ्या | पा | णी |
| ड्या | र | व |

प्रश्न 9 वा : खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (3)

1) फन्ना उडवणे

2) जीव तुटणे.

3) पसार होणे.

प्रश्न 10 वा : खाली दिलेल्या अर्थाच्या शब्दसमूहाकरता एक शब्द लिहा. (3)

1) ज्याला मरण नाही असा

2) खूप दान करणारा

3) सतत भांडण करणारा

## परिशिष्ट (ग)

## उत्तर चाचणी प्रश्नावली

वर्ग : ४ था एकूण गुण : ३०

विषय : मातृभाषा मराठी रोल नंबर :

विद्यार्थ्यांचे नाव : ------------------------------------------------

---

प्रश्न १ ला : खाली दिलेल्या अक्षरांपासून चार अक्षरी अर्थपूर्ण शब्द तयार करा. (२)

१) बा २) वि

प्रश्न २ रा : शब्दाच्या सुरूवातीला किंवा शेवटी अक्षर जोडून नवीन शब्द तयार करा.(२)

१) कार २) प्रति

प्रश्न ३ रा : दिलेल्या उताऱ्याच्या आशयानुसार शब्द निवडून रिकाम्या जागेत भरा.(६)

**(कवने ,रमले,पाडे,पाले ,भटकू ,गुजराण )**

तुकोबांनी १४ वर्षाचे असतानाच घर सोडले व ते रामटेकच्या जंगलात ----- लागले. तेथे कंदमुळावर ----- करत त्यांनी हठयोगाचा अभ्यास केला, त्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासींचे ------- व भटक्यांची ------ धुंडाळत ते फिरले व तेथील गरीब माणसांमध्ये ------- हिंदी, उर्दू व मराठी स्वतःचीच ------ खंजिरी च्या तालावर बेभान होऊन गात असत.

प्रश्न ४ था: चार अक्षरी जोडाक्षरयुक्त शब्द लिहा.(२)

प्रश्न ५ वा: खालील वाक्यातील विशेषण ओळखा.(४)

अ)रंगीबेरंगी फुलांनी सुंदर बाग तयार झाली. ---------- ---------------

ब)आमच्या वर्गातील विवेक स्वभावाने नम्र व अभ्यासात हुशार आहे.

----------- ------------

प्रश्न ६ वा : पुढील शब्द आकारविल्हे क्रमाने लिहा.(३)

अ) कासव,कावळा ,किमया,कीर्तन ,किनारा ,कर्णिक

आ) श्रोता ,श्रावण,श्रीमंत,शर्म,श्रीगणेश,श्रेष्ठ

प्रश्न ७ वा: समानार्थी शब्द लिहा.(३)

१)दिवस  २)पाणी  ३)नदी

प्रश्न ८ वा: दिलेल्या अक्षरांपासून अर्थपूर्ण म्हण तयार करा.(२)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ग | खा | ई | चे | र्वा |
| त्या | घ | ला | र | ख |
| व | खा | ली | ख | वे |

प्रश्न ९ वा: खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करणे.(३)

१) फस्त करणे

२)देहभान विसरणे

३)पोटात कावळे ओरडणे

प्रश्न १० वा: खाली दिलेल्या अर्थाच्या शब्दाकरिता एक शब्द लिहा .(३)

१)कल्पिलेले फळ देणारा -----

२)मधमाशा गोळा करतात ते ---

३) समाजाची सेवा करणारा ------

## परिशिष्ट (घ)

आवर्तन १ घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे मूल्यमापन पदनिश्चयन श्रेणीद्वारे करण्यात आले.

विद्यार्थ्याचे नाव : ------------------------------------

इयत्ता : रोल नंबर : गुण : 30

( उत्तम : 3 गुण , चांगला : 2 गुण , साधारण : 1 गुण )

| अ.क्र. | खेळाचे नाव | खेळातील सहभाग | | |
|---|---|---|---|---|
| | | उत्तम | चांगला | साधारण |
| १ | लपलेल्यांना शोधा | | | |
| २ | चोर शिपाई | | | |
| ३ | मोगऱ्याच्या माळेत गुलाबाची फुले | | | |
| ४ | शब्देश्वर कोण | | | |
| ५ | शब्दांचे मत्स्यालय | | | |
| ६ | बियांतून अंकुरले झाड | | | |
| ७ | मडक्यातील धन शोधा | | | |
| ८ | विखुरलेल्या मण्यांची माळ | | | |
| ९ | अचूक प्रतिमा शोधा | | | |
| १० | अक्षर पाकळया आणि शब्दफुले | | | |

# फोटो
















4:56
Tap a hidden word
5
0
दा श ड दा र सं सा र सा
घ उ घ ड दे श श र उ
ळ ह ह सा ळ दे ळ ळ त
ळ ह सं त सं क सं सा श
सं उ सं त उ क हा ह त
हा र सं हा हा हा र र सा
ड उ दे सा दा घ दा उ दा
क त ह क सा उ दे क हा
घ श सं ड क दे हा ड दे
संदेश संसार उघड
संहार उदार उकळ
संदेह उसंत उकड



